**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१३/२०१०**
**वादीतर्फे साक्षीदार क्र.२**
**निशाणी क्र.४६ पुढे सुरु**

**<u>उलटतपास प्रतिवादी यांचेतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.मर्ढेकर यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

४. मी सुनिलदत्त शामराव यादव यांना ओळखतो. मी डॉ. शामराव हणमंत यादव यांना ओळखतो. दावा मिळकतीचा गट नंबर माझ्या लक्षात नाही. दावा मिळकतीचा ७/१२ उतारा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.३०९ मधील ४गुंठे जमीन दि.०८.०७.१९८६ रोजी शामराव यादव यांनी विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मूळ जमीन ही चंद्रकांत भाऊ जाधव यांची आहे. चंद्रकांत यांनी एकनाथला जमीन कधी विकली ते मला सांगता येणार नाही. मला गट नं.३०९ च्या चतूःसिमा सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, डॉ.शामराव यांच्या मृत्यूनंतर गट नं.३०९ मधील ४ गुंठे क्षेत्र वारसाने सुनिलदत्त यांच्या नावाने झाले. हे म्हणणे खरे नाही की, सुनिलदत्त यांनी स्मशानभूमीसाठी ४ गुंठे करंदीच्या ग्रामपंचायतीला बक्षीसपत्र करुन दिले. हे म्हणणे खरे आहे की, ४ गुंठे रान आता पडीकच आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यात स्मशानभुमी बांधलेली नाही.

५. एकनाथ निकम यांची कोणती जमीन मी करतो त्याचे गट नंबर मला सांगता येणार नाहीत. मी एकनाथची ६ एकर जमीन करतो. ६ एकरच्या चतूःसिमा मला सांगता येणार नाहीत. एकनाथ मला रोखीने पैसे देतो. मी एकनाथला पावत्या देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या तोंडी शब्दाशिवाय त्याला कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत मी वहिवाटत नाही. दावा मिळकतीचे क्षेत्र मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी एकनाथ निकम यांची कोणतीच जमीन वहिवाटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एकनाथ निकम यांनी मला साक्षीसाठी आणलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, एकनाथ निकम यांनी मला साक्ष कशी द्यायची ते सांगितलेले आहे. आमचा जबाब साहेबांनी लिहिला. आमचा जबाब कदम साहेबांनी लिहिला. कदम साहेबांचे व माझे काही बोलणे झाले नव्हते. कदम साहेबांनी माझी सही घेतलेली आहे. जबाब कोठे लिहिला त्याची मला माहिती नाही. जबाबात मजकूर लिहिलेला मला माहिती आहे. जबाबातील मजकूर मी

त्यांना सांगितलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, एकनाथ निकम यांना मदत करण्यसाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

**ठिकाण** : मेढा

आर.बी.खवले,

**दिनांक** : ०७.०२.२०२३

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.**

**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१३/२०१०**
**वादीतर्फे साक्षीदार क्र.१**
**निशाणी क्र.४३ पुढे सुरु**

**<u>उलटतपास प्रतिवादी यांचेतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.मर्ढेकर यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

८. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीला बक्षीसपत्राने जेवढी जागा दिली तेवढ्याचीची नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोंद ही सर्कल यांच्याकडे सर्टिफाय झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्याव्यतिरिक्त त्या नोंदीवर इतर कोणतीही कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या जागेचा कब्जा ग्रामपंचायतीचा आहे. त्या जागेवर माझा कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या जागेवर स्मशानभूमी उभी आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी सरकारी फंडातून स्मशानभूमी उभी केलेली आहे. सुनिलदत्त यादव यांनी दि.०४.०१.२०१० ग्रामपंचायत यांना दावा मिळकत बक्षीसपत्राने दिली का याची मला माहिती नाही.

प्रश्न – सदरचे क्षेत्र हे ग्रामपंचायतीने स्वीकारलेले आहे का ?

उत्तर – तुम्ही म्हणता तर स्वीकारले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, बक्षीसपत्रान्वये ग्रामपंचायतीचा ४ गुंठयाचा कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या बक्षीसपत्रासंबंधी मी प्रांत, कलेक्टर, तहसिलदार इत्यादींकडे कोणतीही कारवाई केलेली नाही. सदरचे कार्यवाहीचे निकाल मी दाव्यात दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात स्टे असताना ग्रामपंचायतीने दावा मिळकतीत स्मशानभूमी उभारली असा अर्ज मी दाव्यात दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या अर्जात न्यायालयाचा अवमान झाला असे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोर्टाच्या आदेशापूर्वीच ग्रामपंचायतीने दावा मिळकतीत स्मशानभूमी उभारलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी स्मशानभुमीत दहनविधीचा कार्यक्रम होतो. सुनिलदत्त यादव यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे का ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी त्यांचा हिस्सा विक्रीस काढलेला नव्हता. सुनिलदत्त यादव यांना पैशांची आवश्यकता होती का नाही ते मला माहित नाही.

प्रश्न – सार्वजनिक हितासाठी सुनिलदत्त यादव याने त्याच्या मालकीची ४ गुंठे जमीन बक्षीसपत्राने ग्रामपंचायतीला दिली ?

उत्तर – दिली असेल.

९. हे म्हणणे खरे आहे की, सुनिलदत्त यादव याला दावा मिळकत मला विकत द्यावी असे मी तोंडी कळविलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दावा मिळकत मी खरेदी घेण्याची इच्छा दर्शवली हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी करण्याचा मला अग्रहक्क आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुनिलदत्त यादव याच्या १आणे हिश्याच्या मालकीबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही.

प्रश्न – सुनिलदत्त यादव यांनी तहसिलदार, प्रांत यांची परवानगी घेवून बक्षीसपत्र केले का?

उत्तर – याची मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात प्रतिवादी क्र.१ ने त्याचा हिस्सा हस्तांतरण करु नये म्हणून दाद मागितली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे खरेदीपत्र हे प्रतिवादी क्र.१ च्या खरेदीनंतर झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदी केलेल्या मिळकतीला सुनिलदत्त यादव याचा १आणे हिस्सा चतूःसिमेत दाखवलेला आहे.

प्रश्न – गट नं.३०९ च्या खरेदीपत्रात त्या मिळकतीच्या चतूःसिमेमध्ये सुनिलदत्त यादव यास १आणे हिस्सा आहे असे चतूःसिमेत लिहिलेले आहे का ?

उत्तर – नाही

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यातील परिच्छेद क्र.२ मधील पहिल्या तीन ओळी बरोबर लिहिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, १आणे हिस्सा सोडून उर्वरीत १५आणे मिळकतीचा हिस्सा मला मिळाला. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.३०९ चे खरेदीपत्र करुन घेताना गट नं.३०९ च्या मिळकतीपैकी १५आणे हिस्स्याचा मालकी व कब्जा मी खरेदीपत्राने घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.३०९ मध्ये १५आणे मिळकतीव्यतिरिक्त माझा अन्य हिश्यावरती कब्जा नाही.

प्रश्न – गट नं.३०९ मधील १आणेचा हिस्सा उत्तर बाजूची म्हणजेच ०हे. ४आर मिळकत ही प्रतिवादीच्या वडीलांनी श्री. चंद्रकांत भाऊ जाधव अ.पा.क. यमुनाबाई भाऊ जाधव यांच्याकडून खरेदी केलेला आहे ?

उत्तर – ते मला माहित नाही.

प्रश्न – प्रतिवादी सुनिलदत्त यादव यांच्या वडीलांचा गट नं.३०९ मध्ये खरेदीच्या दिनांकापासून १आणे म्हणजेच ०हे. ४आर वरती हिस्सा होता व आहे ?

उत्तर – हे मला माहित नाही.

सुनिलदत्त हा कुडाळमध्ये राहतो का ते मला माहित नाही.

प्रश्न – सुनिलदत्तचे वडील मयत झाल्यानंतर दावा मिळकतीचा कब्जा हा सुनिलदत्तकडे आला ?

उत्तर – ते मला माहित नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात केलेली कथने ही ४गुंठे जमीन हडपण्यासाठी केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

**ठिकाण** : मेढा

**दिनांक** : १३.०९.२०२२

आर.बी.खवले,

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.**